जा.क्र. मरापप/शिष्यवृत्ती/२०१७/१६३९
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे १
दिनांक :- १८/०३/२०१७

प्रति,

मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२

**विषय :- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) २६फेब्रुवारी २०१७, बाबतच्या प्रसिद्धी निवेदनाबाबत...**

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. २६/०२/२०१७ रोजी या कार्यालयामार्फत घेण्यात आली. वरील परीक्षेच्या प्रत्येकी दोन्ही प्रश्नपत्रिकांची अंतीम उत्तरसूची परिषदेच्या www.mscepune.in व www.puppss.in या संकेतस्थळावर या परीक्षेचे परीक्षार्थी, मार्गदर्शक, शिक्षक, पालक, शाळा आणि क्षेत्रिय अधिकारी यांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सोबत प्रसिद्धी निवेदन जोडले आहे. कृपया सदरहू निवेदनास राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रातून, आकाशवाणीवरुन व दूरदर्शन केंद्रावरुन योग्य ती प्रसिद्धी विनामूल्य देण्यात यावी अशी विनंती आहे.

सोबत :- प्रसिद्धी निवेदन

**आपला विश्वासू**

**(सुखदेव डेरे)**
**आयुक्त ,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१**

**प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

**१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)**
**२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. (सर्व)**
**३) शिक्षणाधिकारी महानगरपालिका, बृहन्मुंबई**
**४) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)**

14/02/2017

# प्रसिद्धीपत्रक

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

### पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) फेब्रुवारी २०१७

### अंतिम उत्तरसूची

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २६ फेब्रुवारी, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.८ वी) या परीक्षांची सर्व माध्यमांची व सर्व विषयांची अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची दि. ०३ मार्च, २०१७ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

अंतरिम (तात्पुरत्या) उत्तरसूची संदर्भात विहित मुदतीत आलेले आक्षेप व त्रुटींबाबतची लेखी निवेदने, तसेच विषय तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन परिषदेने उत्तरसूची सुधारित केली आहे. या उत्तरसूचीतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. या अंतिम उत्तरसूचीबाबत आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, या अंतिम उत्तरसूचीच्या आधारे निकाल तयार करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर प्रसिद्धीपत्रक अंतिम उत्तरसूचीसह परिषदेच्या www.mscepune.in व www.puppss.in या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१.

ठिकाण - पुणे
दिनांक - १८/03/२०१७